सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे माजी क्रिकेटपटू प्रशांत श्रृंगारे व रजत खोपडे यांचा एमपीएससी परीक्षेतील यशाबद्दल प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शेजारी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. शरद बनसोडे, वैभव ढेरे उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठाच्या माजी क्रिकेटपटूंचे स्पर्धा परीक्षेत यश

कोल्हापूर, ता. २३ : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये शिवाजी विद्यापीठाचे माजी क्रिकेटपटू प्रशांत श्रृंगारे आणि रजत खोपडे यांनी यश संपादन केले. त्याबद्दल विद्यापीठातर्फे त्यांचा प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

'एमपीएससी'तर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेद्वारे प्रशांत श्रृंगारे यांची पी.एस.आय.पदी, तर रजत खोपडे यांची मंत्रालय सहाय्यकपदी निवड झाली आहे. या दोघाही खेळाडूंनी २०१३ ते २०१५ दरम्यान शिवाजी विद्यापीठाचे आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत प्रतिनिधित्व केले आहे.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'खेळाडू म्हणून कारकीर्द घडवत असतानाच त्याच्या बरोबरीने स्पर्धा परीक्षेमध्ये या दोघांनी मिळविलेले यश कौतुकास्पद आहे. त्याचबरोबर क्रीडा क्षेत्राद्वारे करिअर घडविण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांसाठीही आदर्शवत स्वरुपाचे आहे. आपल्या या नूतन जबाबदाऱ्या पेलत असताना क्रीडा क्षेत्राकडे दुर्लक्ष न करता आपली कारकीर्द घडवित राहावे.' डॉ. पाटील यांनी या खेळाडूंशी परीक्षेसंदर्भात येणाऱ्या अडचणी आणि अभ्यासाचे नियोजन याविषयी चर्चा केली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, प्रा. सुजय खोपडे उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे माजी क्रिकेटपटू प्रशांत श्रृंगारे, रजत खोपडे यांचा निवडीबद्दल सत्कार करताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शरद बनसोडे, डॉ. वैभव ढेरे आदी.

# शिवाजी विद्यापीठाच्या माजी क्रिकेटपटूंचा स्पर्धा परीक्षेत यशाबद्दल गौरव

कोल्हापूर : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये शिवाजी विद्यापीठाचे माजी क्रिकेटपटू प्रशांत श्रृंगारे व रजत खोपडे यांनी यश संपादन केल्याबद्दल प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. प्रशांत श्रृंगारे यांची पीएसआय तर रजत खोपडे यांची मंत्रालय सहायकपदी निवड झाली आहे. या दोघाही खेळाडूंनी २०१३ ते २०१५ या कालावधीत आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत प्रतिनिधित्व केले आहे. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, प्रा. सुचय खोपडे उपस्थित होते.

24 JUL 2023 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या माजी क्रिकेटपटूंचे स्पर्धा परीक्षेत यश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये शिवाजी विद्यापीठाचे माजी क्रिकेटपटू प्रशांत शृंगारे आणि रजत खोपडे यांनी यश संपादन केल्याबद्दल विद्यापीठातर्फे त्यांचा प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेद्वारे प्रशांत शृंगारे यांची पीएसआयपदी, तर रजत खोपडे यांची मंत्रालय सहायकपदी निवड झाली आहे. या दोन्हीही खेळाडूंनी २०१३ ते २०१५ साली शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत प्रतिनिधित्व केले आहे.



**कोल्हापूर : प्रशांत शृंगारे व रजत खोपडे यांचा सत्कार करताना प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील. सोबत प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.**

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, खेळाडू म्हणून कारकीर्द घडवत असतानाच त्याच्या बरोबरीने स्पर्धा परीक्षेमध्ये या दोघांनी मिळवलेले यश कौतुकास्पद आहे. आपल्या या नूतन जबाबदाऱ्या पेलत असताना क्रीडा क्षेत्राकडे दुर्लक्ष न करता आपली कारकीर्द घडवत राहावे, असेही त्यांनी सांगितले. डॉ. पाटील यांनी या खेळाडूंशी परीक्षेसंदर्भात येणाऱ्या अडचणी आणि अभ्यासाचे नियोजन याविषयी चर्चा केली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, प्रा. सुचय खोपडे उपस्थित होते.

पुढारी

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह आजपासून सुरू

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ला तीन वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून २४ ते २९ जुलै दरम्यान 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताहा'चे आयोजन करण्यात आले आहे. याबाबतचे निर्देश राज्याच्या उच्चशिक्षण संचालकांनी सर्व विद्यापीठांना काढल्याची माहिती कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अशोक उबाळे यांनी दिली.

केंद्र सरकारने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जारी केले आहे. त्यानुसार राज्य सरकारने ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील कार्यबल गट स्थापन केला. त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सहा उपसमित्या स्थित केल्या असून त्यानुसार कामकाज सुरू आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताहातंर्गत विद्यापीठ, संलग्न महाविद्यालयात पोस्टर, निबंध, वकृत्व स्पर्धा, व्हिडीओज, रिल्स स्पर्धांचे आयोजन केले जाणार आहे. महाविद्यालयात प्रदर्शनासह चर्चा, तज्ज्ञांच्या मुलाखती, सोशल माध्यमांवरून विद्यार्थी, पालक, शक्षकांपर्यंत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण पोहचविले जाणार आहे.

सकाळ

# नव्या शैक्षणिक धोरणाबाबत आज विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यांबाबत आणि नॅक मूल्यांकनाच्या अनुषंगाने विद्यापीठाने सोमवारी (ता. २४) दुपारी अडीच वाजता कार्यशाळा आयोजित केली आहे. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होईल. अशी माहिती उपकुलसचिव विलास सोयम यांनी दिली. कार्यशाळेत नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंतर्गत महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर गुणवत्ता शिक्षण, नॅक मूल्यांकन, परिसस्पर्श योजना, इन्स्टिट्यूशन डेव्हलपमेंट प्लॅन आदी आणि महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासाच्या अनुषंगाने चर्चा होणार आहे. त्यासाठी विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व संस्थाचालक, प्राचार्य, संचालक उपस्थित राहणार आहेत.

लोकमत

# पदवीला 'पर्यावरण अभ्यास'ची अंमलबजावणी करा

कोल्हापूर : नवीन शैक्षणिक धोरण 2020 नुसार पदवीच्या सर्व शाखेकडे पर्यावरण अभ्यास विषय प्रथम वर्षापासून अनिवार्य करावा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाने पर्यावरण विषयाची सुरुवात झाली असून पर्यावरणाच्या संरक्षणासाठी विद्यार्थ्यांमध्ये जागृती आवश्यक आहे. थेअरीसह प्रॅक्टिकलचे प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठीचे निवेदन पर्यावरण अभ्यास शिक्षक संघटनेच्या वतीने शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डी. टी. शिर्के यांना देण्यात आले.

नवीन शैक्षणिक धोरणात पदवीला विद्यार्थ्याला आवडीच्या विषयांची निवड करता येणार आहे. यामध्ये पर्यावरण अभ्यास हा अनिवार्य विषय असावा. थेअरीसह प्रॅक्टिकल व प्रकल्प कार्य अनिवार्य करावे. निवेदन देण्यासाठी संघटनेचे प्रा. माणिक पाटील प्रा. संदीप होरे, प्रा. दीपा पाटील, प्रा. जयशीला करडे, प्रा. निर्मला साकरपे आदी उपस्थित होते.

तरुण भारत

थोडक्यात महत्त्वाचे



# आज विद्यापीठ परीक्षा नियोजित वेळेत होणार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सोमवार (दि. २४) होणाऱ्या परीक्षा नियोजित वेळेत होणार आहेत. बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ आर्टस्, बॅचलर ऑफ फार्मसी, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑ फ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन या विषयांच्या परीक्षा दोन सत्रात होणार आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा तिन्ही जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांवर परीक्षा घेण्यास कोणतीही अडचण नाही. कळंबे तर्फ कळे येथील आनंदीबाई कॉलेज ऑ फ फार्मसी येथील परीक्षा केंद्रावर परीक्षेला येण्यासाठी तीन ते चार विद्यार्थ्यांना अडचण येत होती. त्यामुळे महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी संबंधीत विद्यार्थ्यांना कॉलेजवरील वसतिगृहात राहण्यासाठी रविवारीच बोलावून घेतले. त्यामुळे आज (दि. २४) रोजी होणाऱ्या सर्व परीक्षा नियोजित वेळेत होणार आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

# सह्याद्रीचा कडा ढासळतोय... आता तरी सावध व्हा!

**निसर्गातील एकेक घटक आपण नष्ट करीत चाललो आहोत. ते तातडीने थांबविले पाहिजे, अन्यथा निसर्गचक्राबरोबर माळीण, तळिये, इर्शाळवाडी घडतच राहणार!**

**सह्याद्रीच्या** पर्वतरांगात अनेक ठिकाणी दरड कोसळण्याचे प्रसंग घडत आहेत. या धोक्याची जाणीव २०११ साली माधव गाडगीळ समितीने करून दिली होती. संपूर्ण पश्चिम घाटाचा अभ्यास करून त्यांनी हा अहवाल दिला होता. या अहवालात अनेक उपाययोजना सूचवल्या होत्या. मात्र या अहवालावर पुढील प्रभावी अंमलबजावणी झाली नाही. परिणामी मागील दहा वर्षात दरड कोसळण्याच्या घटनांमध्ये १०० टक्के नव्हे, १०० पट वाढ झाली. जो सह्याद्रीचा कडा हजारो वर्षे अविचल होता, आज तो अनेक ठिकाणी ढासळत आहे.

रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडी गाडली गेली. दरड कोसळल्याने अलीकडे माळीण गाव पूर्ण गाडले गेले. ही घटना विस्मृतीत जाण्यापूर्वी रायगड जिल्ह्यातील तळिये गाव कोसळलेल्या दरडीबरोबर गाडले गेले. गतवर्षी पन्हाळ्याची तटबंदी कोसळली. विशाळगडावरही भेगा पडल्या. या सर्वांचे खापर अतिवृष्टीवर टाकले जाते. मात्र यापेक्षा जास्त पावसातही टिकून असणाऱ्या दरडी आताच का कोसळतात, याचा विचार करायला हवा.

कोकण हे निसर्गाचं लाडकं आणि देखणं लेकरू विकासाच्या नादात पोखरले जात आहे. कोकणामध्ये रस्ते बांधताना ज्या पद्धतीने काम सुरू आहे, ते पाहूनच धोके लक्षात येतात. कोकणातील डोंगररांगा एक तर कातळ दगडांच्या किंवा लाल माती, दगडांच्या आहेत. महामार्गांच्या बांधकामासाठी अनेक झाडांची तोड होते. महामार्ग जाणाऱ्या भागातील माती काढून टाकली जाते. चढ खोदून बाजूला केले जातात. उतारावर भर घालण्यात येते. या कामासाठी अवजड यंत्रे वापरली जातात. या यंत्रांच्या हादऱ्याने कोकण भूमीत असणारी मृदा सैल होते. पाऊस पडला की उघडी जमीन पाण्याबरोबर मातीही पाठवत राहते. सैल झालेल्या भागातून पाणी जाऊ लागले की भेगा रुंदावतात. अशा भागात रस्ते बांधताना मोठी आणि अवजड कंप करणारी यंत्रे न वापरता मनुष्यबळाचा वापर करून हळुवारपणे गरजेपुरत्या भागातील माती काढण्याची गरज असते. मात्र मानवी बळाचा वापर करून असे मोठे प्रकल्प पूर्ण करावयाचे झाल्यास त्यासाठीचा खर्च आणि वेळ वाढतो. खर्च आणि वेळेची केलेली बचत पुढे मोठ्या विनाशाकडे घेऊन जाते.

काही वर्षांपूर्वी सोळा देशांना त्सुनामीचा फटका बसला. या त्सुनामीमुळे किनाऱ्यांवरील अनेक गावांत प्रचंड हानी झाली. त्यामधून ज्या गावांनी किनारपट्टीवरील खारफुटी किंवा मँग्रोव्हजची तटबंदी अबाधित ठेवली होती, ती गावे बचावली. त्या गावांमध्ये कोणतीही जीवित आणि वित्तहानी झाली नाही, हे लक्षात घ्यायला हवे. मागील काही वर्षांमध्ये कोकणात खाजगी मालकीची जमीन मोठ्या प्रमाणात विकली गेली. या जमिनीवर खाजगी मालकीचे जंगल होते. या जमिनी, पैसेवाल्या धनदांडग्यांनी खरेदी केल्या. त्या जमिनीवरील जंगल मोठ्या प्रमाणात तोडले गेले.

**डॉ. व्ही. एन. शिंदे**



प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ

कोकण आणि सह्याद्री लाल मातीने व्यापलेला. ही माती ऊन-वारा आणि पावसामुळे लगेच सुटी होते. पाऊस पडू लागला की तिला घट्ट पकडून ठेवणारी झाडांची मुळे आणि गवताचे आवरण नष्ट झाले असल्याने पाण्याबरोबर वाहू लागली. ती नदी पात्रात जमा होते आणि उथळ बनते.

कोकणातील नद्या तीव्र उतारावरून धावत असल्याने मोठा भाग समुद्रातही वाहून जातो. नद्यांचे पात्र उथळ झाले की आपोआप पावसाचे पाणी आजूबाजूच्या भूभागात पसरते. तसेच गवताळ, झाडांनी व्यापलेल्या डोंगरमाथ्यावर मध्येच अशी बाग तयार झाली, तर ज्या भागात गवताळ आणि वृक्षराजीने झाकलेला भाग आहे, तो जास्त पाणी पकडून ठेवतो. तो भाग जड बनतो. वरचा भाग त्याच पद्धतीचा नसल्याने हा कडेला असणारा भाग सुटून खाली येतो.

निसर्गातील सर्व घटक परस्परपूरक भूमिका पार पाडत असतात. त्यामुळे मनुष्य वगळता अन्य जीव भरमसाठ वाढत नाही. त्यांची संख्या, मर्यादा ओलांडत नाही. काही वनस्पती आणि प्राणी पाण्याचे शुद्धीकरण करतात.

एक अन्नसाखळी कार्यरत असते. या साखळीतील कडी तुटली, तर त्यांनी करावयाचे कार्य अपूर्ण राहते. त्यामुळे निसर्गातील एकेक घटक जसे नष्ट होतात, तसे त्याचे दुष्परिणाम कालौघात दिसून येतात. हे टाळायला आपण शिकलो, तसे वागलो, तर ही वसुंधरा टिकेल. अन्यथा निसर्गचक्राबरोबर माळीण, तळिये, इर्शाळवाडी घडतच राहणार!